RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२५१ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.८ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मराठा आंदोलकांवरील लाठीचार्ज बचावात्मक आणि वाजवी; फडणवीसांचं सभागृहात लेखी उत्तर

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यात मागील काही महिन्यांपासून मराठा आरक्षणाचा प्रश्न धुमसत आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातही हा मुद्दा चर्चेत आला असून मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीचार्जच्या घटनेबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नाला भाजप नेते आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तर दिलं आहे. या उत्तरात फडणवीसांनी दिलेल्या माहितीने पुन्हा एकदा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण मराठा आरक्षण आंदोलनात करण्यात आलेला लाठीचार्ज हा बचावात्मक आणि वाजवी असल्याचा उल्लेख फडणवीस यांनी आपल्या उत्तरात केला आहे.

विधिमंडळ अधिवेशनाच्या लेखी प्रश्नोत्तरामध्ये आमदारांनी मराठा आंदोलनादरम्यान घडलेल्या घटनांबाबत गृहमंत्री फडणवीस यांच्याकडे माहिती मागवली होती. या प्रश्नांना उत्तर देताना फडणवीस यांनी म्हटलं आहे की, जालना जिल्ह्यातील सदर आंदोलनात हिंसक जमावाकडून करण्यात आलेल्या दगडफेकीत ७९ पोलीस अधिकारी आणि अंमलदार जखमी झाले आहेत. अंतरवाली सराटीत पोलिसांनी बचावात्मक पद्धतीने बळाचा वाजवी वापर केला. यामध्ये ५० आंदोलक जखमी झाले.

दरम्यान, आधी पोलिसांनी लाठीचार्ज सुरू केला आणि त्यानंतर आंदोलकांकडून दगडफेक करण्यात आली, असा दावा मनोज जरांगे यांच्यासह मराठा आंदोलक करत असताना गृहमंत्री फडणवीस यांनी मात्र आधी दगडफेक झाल्याने बचावात्मक पद्धतीने पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचं सांगितल्याने पुन्हा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.



### गुन्हे मागे घेण्याचा निर्णय तपासणीअंती

मराठा आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घ्या, अशी जरांगे पाटलांची मागणी आहे. मात्र याबाबत फडणवीसांनी भूमिका स्पष्ट करत 'मराठा आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याच्या अनुषंगाने तपासणी करून आवश्यक कारवाई करण्यात येईल' असं म्हटलं आहे.

## सावरकरांचा अपमान करणाऱ्या प्रियांश खर्गे यांचा पुतळा जाळून युवा मोर्चाचे निषेध आंदोलन

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

काँग्रेसचे कर्नाटक मधील मंत्री काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे सुपुत्र प्रियंक खरगे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर केलेल्या अपमान जनक वक्तव्याचा निषेध म्हणून भारतीय जनता युवा मोर्चा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने आज त्यांचा पुतळा जाळून निषेध व्यक्त करण्यात आला,यावेळी यावेळी भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव जयंत डेहनकर, माजी महापौर चेतन गावंडे, भाजपा अमरावती शहर सरचिटणीस विवेक कलोती, युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस बादल कुलकर्णी, प्रदेश सचिव प्रणित सोनी हरीश साऊरकर,युवा मोर्चा अमरावती शहरजिल्हा अध्यक्ष कौशिक अग्रवाल,लल मोर्चा अध्यक्ष कुणाल टिकले, युवा मोर्चा सरचिटणीस प्रवीण रुद्रकार अखिलेश राठी उपाध्यक्ष यश पटवा,युवा मोर्चा उपाध्यक्ष त्रिदेव देंडवाल,सूरज जोशी,अखिलेश किल्लेदार,अल्पेश जुनघरे,अमृत यादव,वैभव बेलसरे,विजय उपाध्याय,मंदार नानोटी,यश शर्मा,सूरज वासनिक,अखिलेश किल्लेदार,गोपाल साहू,युवा मोर्चा सचिव आशुतोष शर्मा,अखिलेश खडेकार, श्रीतेज धानोरकर,अमित राठोड, सारंगमाथूरकर, मनीष झांबानी, मनीष आडवीकर,वेदांत वानखडे,अनिकेत विश्वकर्मा, युवा मोर्चा विद्यार्थी आघाडी संयोजक विक्की शर्मा,युवा मोर्चा खेल आघाडी संयोजक आकाश कविटकरऋषिकेश चौबे, तसेच भाजपा व भाजयुमो चे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



## राम मंदिराच्या उद्घाटनाच्या दिवशी राष्ट्रीय सुटी जाहीर करा, महंत अनिकेत शास्त्रींची मागणी

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

अयोध्येत राम मंदिराचे बांधकाम वेगाने सुरू आहे. राम मंदिरात २२ जानेवारी २०२४ रोजी हजारो भाविक, मान्यवारांच्या उपस्थितीत रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. त्यामुळे हा दिवस संपूर्ण देशासाठी खूप मोठा आणि ऐतिहासिक असणार आहे. यामुळेच २२ जानेवारी ०२२४ रोजी संपूर्ण देशात सुट्टी जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अयोध्येतील भव्य राम मंदिराच्या उद्घाटनाचा दिवस म्हणजे २२ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रीय सुट्टी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय संत समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महंत अनिकेत शास्त्री यांनी राज्य आणि केंद्र सरकारकडे केली आहे. महंत अनिकेत शास्त्री म्हणाले की, हा सर्व हिंदूसाठी आनंदाचा दिवस आहे. अशा परिस्थितीत, मी महाराष्ट्र आणि केंद्र सरकारांना आवाहन करतो की, २२ जानेवारी २०२४ रोजी भव्य राम मंदिराचे उद्घाटन होणार आहे, तेव्हा हा दिवस राष्ट्रीय सुट्टी म्हणून घोषित करावा, जेणेकरून सर्व देशवासियांना या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होऊ शकेल.

दरम्यान, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त आणि उडुपी पेजावर मठाचे प्रमुख श्री विश्वप्रसन्न तीर्थ यांनी १६ नोव्हेंबरला सांगितले होते की, २२ जानेवारीला मंदिरात रामलला मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर भाविकांना अयोध्येत जाऊन प्रभू श्री रामाचे दर्शन घेता येईल. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 'अभिजीत मुहूर्तावर' मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाईल. सुरक्षेच्या कारणास्तव, उद्घाटनाच्या दिवशी केवळ आमंत्रित पाहुण्यांनाच मंदिरात प्रवेश दिला जाईल, असेही ते म्हणाले होते.





### प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी दिग्गजांना आमंत्रण

विशेष म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना २२ जानेवारीला होणाऱ्या या प्राणप्रतिष्ठा समारंभासाठी आधीच आमंत्रण देण्यात आले आहे. तसेच, ट्रस्टने ३००० व्हीव्हीआयपींसह ७००० जणांना आमंत्रण पाठवले आहे. आमंत्रित व्हीव्हीआयपींमध्ये राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक मोहन भागवत, योग गुरु राम देव, उद्योगपती रतन टाटा, उद्योगपति गौतम अधाणी यांचा समावेश आहे. याशिवाय, 'रामायण' मालिकेत प्रभू श्रीरामाची भूमिका साकारणारे अभिनेते अरुण गोविल आणि सीता मातेची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री दीपिका चिखलिया यांच्या नावाचा समावेश आहे.

## शेतकऱ्यांच्या हातावर देते तुरी, सरकार घेते टक्केवारी विरोधी पक्ष राज्य सरकारविरोधात आक्रमक

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

अवकाळी पावसाने राज्यभरातील शेतकरी हतबल झाला आहे. या मुद्द्यावर विरोधकांनी सत्तापक्षाला घेरत कापूस, सोयाबीन आणि धानाला भाव मिळावा यासाठी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायथ्याशी शुक्रवारी धरणे देत सरकारविरुद्ध जोरदार घोषणाबाजी केली.

आंदोलनात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादार दानवे, अशोक चव्हाण, अनिल देशमुख, नाना पटोले, अभिजित वंजारी, रवींद्र वायकर, सचिन अहिर आदींचा सहभाग होता. यावेळी दानवे म्हणाले,'कापूस, धान आणि सोयाबीनला भाव मिळावा यासाठी रस्त्यावर उतरलो आहे. सरकारचे आयात-निर्यात धोरण शेतकऱ्याच्या मुळावर उठले आहे. दहा हजार कोटींच्या मदतीची घोषणा खोटी आहे. सरकार फक्त आकडेवारी फेकते आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शहरालगतच्या शेतात गेले पण त्यातून काहीही साध्य झालेले नाही. ज्यावेळी जायचे होते तेव्हा ते तेलंगणच्या निवडणुकीत प्रचार करण्यात व्यस्त होते.

आम्ही सभागृहात कापूस, धान, सोयाबीनला भाव मिळावा यासाठी संघर्ष करू. आंदोलनात कापसाच्या माळा घालून आमदारांनी 'अवकाळी पावसाने शेतकरी त्रस्त, पंचनामे करणारे सरकार सुस्त,' 'अवकाळीने निघते शेतकऱ्यांचे दिवाळे, गद्दारांना लागले मंत्रिमंडळ विस्ताराचे डोहाळे,' 'शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रुंचा सागर, सरकार देते नुसते गाजर,' अशा लक्षवेधक घोषणा दिल्यात.




## राजनाथ सिंह, विनोद तावडेंवर मोठी जबाबदारी; तीन राज्यांत पर्यवेक्षकांची नावे भाजपकडून जाहीर

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

भाजपाने राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये पर्यवेक्षकांची नियुक्ती केली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, विनोद तावडे आणि सरोज पांडेय यांच्यावर मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

मध्यप्रदेश, राजस्थानमध्ये मुख्यमंत्री पदावरून सर्वाधिक रस्सीखेच सुरु आहे. वसुंधरा राजेंनी आमदारांना गोळा करून त्यांची परेडही वरिष्ठ नेत्यांसमोर करवली होती. तर एका माजी आमदाराने त्यांच्या मुलासह साठ आमदारांना राजेंनी एका रिसॉर्टमध्ये रोखल्याचा आरोप केला होता.

दुसरीकडे मध्य प्रदेशमध्येही मुख्यमंत्री पदासाठी केंद्रातून मंत्रिपद सोडून राज्यात आलेले तोमर यांच्यासह मावळते मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहाण व महासचिव विजयवर्गीय यांची नावे चर्चेत आहेत. यामुळे दिल्लीत जोरदार बैठका सुरु झाल्या आहेत. येत्या रविवारपर्यंत तिन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे.



या निवडीनंतर अंतर्गत हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी तसेच मुख्यमंत्री पदाच्या शपथविधीसाठी भाजपाने तिन्ही राज्यांमध्ये पर्यवेक्षक नेमले आहेत. राजनाथ, तावडे आणि पांडेय यांच्यावर राजस्थानची जबाबदारी टाकली आहे. हरियाणा सीएम मनोहर लाल खट्टर, के लक्ष्मण, आशा लकड़ा यांना मध्य प्रदेशची जबाबदारी दिली आहे. छत्तीसगडसाठी अर्जुन मुंडा, सर्वानंद सोनोवाल आणि दुष्यंत गौतम यांची निवड करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत कोणती नावे?

राजस्थानः मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत वसुंधरा राजे, खासदार दिया कुमारी, ओम बिर्ला, भूपेंद्र यादव, गजेंद्र सिंह शेखावत आणि बाबा बालकनाथ यांची नावे आहेत.

मध्य प्रदेशः शिवराज सिंह चौहान, प्रल्हाद पटेल, नरेंद्र सिंह तोमर, कैलाश विजयवर्गीय आणि ज्योतिरादित्य सिंधिया यांच्यासह अनेक नावे मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत आहेत.

## सदनमध्ये बाजूबाजूला बसतात आणि पत्र लिहून नाराजी व्यक्त करतात : संजय राऊत


**दि.८विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

नागपुरात हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. या अधिवेशनाला माजी मंत्री आमदार नवाब मलिक यांनी उपस्थिती लावली आहे. आमदार मलिक कोणत्या बाजूच्या बाकावर बसणार यावरुन जोरदार चर्चा रंगल्या होत्या. अखेर मलिक सत्ताधारी बाकावर बसल्याने आरोप-प्रत्यारोपांना सुरूवात झाली आहे. विरोधकांनीही सवाल उपस्थित करत भाजपवर टीका केल्या, यावर का उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्र लिहून नाराजी व्यक्त केली, या पत्रावरुनही आता फडणवीस यांच्या टीका सुरू झाल्या आहेत.

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका करत सवाल उपस्थित केले आहेत. नवाब मलिकांच्यावर तुम्ही आरोप करता मग त्याच प्रकारची केस खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यावर आहे त्यांचीही ईडीने प्रॉपर्टी ईडीने जप्त केली आहे. त्यांच्यावर दाऊदच्या जमिनीचा व्यवहार केल्याचा आरोप आहे, त्यांच्याबाबत देवेंद्र फडणवीस यांची भूमिका काय आहे, असा सवालही संजय राऊत यांनी केला.

सदनमध्ये बाजूबाजूला बसतात आणि पत्र लिहून नाराजी व्यक्त करतात. हे सर्व ढोंग आहे, असे ढोंग भाजप करत असते. वाटत असेल तर सदनमध्ये उभं राहून बोला, असा टोलाही राऊत यांनी लगावला.

महायुती बिघाडणे हे ढोंग आहे. नवाब मलिक हे राष्ट्रवादीचे आमदार आहेत. त्यांच्याबाबत त्यावेळी अजित पवार, जयंत पाटील यांनी भूमिका घेतली होती. त्यावेळी विधानसभेत आणि विधानसभेच्या बाहेर भाजपच्या नेत्यांनी जी भाषणे केली ते पाहण्यासारखे आहे. आता मलिक बाहेर सुटले आहे ते आता सत्ताधारी बाकावर जाऊन बसले आहेत. आता ते पत्र देऊन नैतिकतेच्या डरकाळ्या फोडत आहेत. आता ते सत्तेपेक्षा देश महत्वाचा सांगत आहेत, असंही ते म्हणाले.



## महाराष्ट्रासाठी लवकरच एव्हिएशन पॉलिसी देवेंद्र फडणवीसांनी दिली माहिती

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

एव्हीएशन हे विशाल क्षेत्र आहे. हे क्षेत्र अतिशय वेगाने वाढत आहे. त्याचा फायदा महाराष्ट्राला झाला पाहिजे. त्यामुळे महाराष्ट्रासाठी लवकरच एव्हिएशन पॉलिसी तयार केली जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिली. फडणवीस यांच्या हस्ते मिहानमधील इंडामेर-एअरबस हेलिकॉप्टर एमआरओचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

नागपूरच्या वाटचालीमध्ये हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तो दिवस दूर नाही जेव्हा येथे हेलिकॉप्टरचे प्रत्यक्ष उत्पादनही सुरू होईल. एमआरओमुळे नागपुरात हेलिकॉप्टरची फार मोठी इकोसिस्टीम तयार झाली आहे. हेलिकॉप्टरचा उपयोग जगामध्ये मोठ्या प्रमाणात मेडिकल सर्विसेस, पर्यटन, कायदा सुव्यवस्था या सगळ्या गोष्टींसाठी होत आहे. एव्हिएशन पॉलिसीमध्ये या सर्व बाबींचा समावेश राहील, असेही फडणवीस म्हणाले.

## संपादकीय ......

# विजयाचा शंख जपून वाजवा

पाच राज्यांतील निवडणुकांनंतर चार राज्यांपैकी तीन राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल आपल्या बाजूने लागल्यामुळे भाजपच्या नेत्यांच्या बाहुंमध्ये स्फुरण चढले असून लोकसभेच्या निवडणुकीसाठी आता ते हुप्पा हुय्या करू लागले आहेत. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, मिझोराम या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका या पुढील वर्षी होणार्या लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर असल्यामुळे लोकांचा कल कुणाच्या बाजूला आहे हे दाखवून देऊ शकतील, म्हणून पाच राज्यांतील या निवडणुकांना लोकसभा निवडणुकीअगोदरची सेमी फायनल, असे म्हटले जात आहे. या सेमी फायनलमध्ये भाजपची सरशी होताना दिसत आहे, पण निर्जीव झालेल्या काँग्रेसने तेलंगणामध्ये मोठी मुसंडी मारून राष्ट्रीय पक्ष म्हणून असलेली आपली ताकद दाखवून दिली आहे.

मिझोराममधील निकाल आज जाहीर होईल, पण सध्या तरी तीन राज्यांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध करून भाजपने मोदी हैं तो मुमकीन हैं, हे दाखवून दिले आहे. सेमी फायनल जिंकल्याचा भाजपच्या नेत्यांना अतोनात आनंद झालेला आहे. महाराष्ट्रातील भाजप नेत्यांना तर गगन ठेंगणे झाले आहे, तर त्याचसोबत विरोधातील नेत्यांची सध्या भाजपवर टीका करण्यासाठी शब्दांची शोधाशोध सुरू असावी. त्यामुळे भाजपवर सातत्याने तोफा डागणारे ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांच्यावर भाजपचे नेते तोंडसुख घेत आहेत. मोदींच्या जीवावर आपण मैदान मारू शकतो, असे भाजपच्या नेत्यांना वाटत आहे. आपण सेमी फायनल जिंकलो आहोत, आता फायनल आम्हीच जिंकणार, या विश्वासाने भाजप नेते जल्लोष करत आहेत, पण त्याच वेळी त्यांना या गोष्टीचा विसर पडला आहे की गुजरातच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी हजर असतानाही क्रिकेट वर्ल्डकपमध्ये सलग १० सामने जिंकलेला भारतीय संघ फायनलमध्ये पराभूत झाला, हे अतिशय अनपेक्षित होते.

भारतच जिंकणार असे सगळ्यांना वाटत होते. याच शक्यतेचा उपयोग करून भारतीय संघ जिंकल्यावर त्याचा मोठा इव्हेंट करण्याची तयारी भाजपने केली होती, पण अनपेक्षितपणे भारतीय संघ वर्ल्डकपच्या फायनलमध्ये पराभूत झाला आणि भाजपच्या इव्हेंटबाजीतील सगळी हवा निघून गेली. ज्या भारतीय खेळाडूंसोबत विजयी वर्ल्डकप उंचावण्याचे मोदींचे स्वप्न होते, त्याच भारतीय खेळाडूंचे त्यांना ड्रेसिंग रूममध्ये जाऊन सांत्वन करावे लागले. भाजपच्या सर्व राज्यातील नेत्यांनी हे लक्षात घ्यायला हवे की, मोदी हैं तो हर बार मुमकीन हैं, असे होत नाही. भारतीय संघ जिंकणार असे शंभर टक्के वाटत असताना तो संघ पराभूत झाला. सेमी फायनलमध्ये जिंकलेला संघ फायनलमध्ये हरला.

त्यामुळे भाजपच्या नेत्यांनी हे लक्षात ठेवायला हवे की, आपण आता निवडणुकांची सेमी फायनल जिंकलो असलो तरी फायनलचा निर्णय वेगळा असू शकतो. त्यामुळे त्यांनी या विजयाचा शंख जपून वाजवावा. मध्य प्रदेशमध्ये शिवराजसिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली मागील काही वर्षे भाजपची सत्ता आहे. त्यातही मध्यंतरी भाजपच्या हातून गेलेली सत्ता त्यांनी कोरोना काळात पुन्हा मिळवली. राजस्थानमध्ये सत्ता बदलाची परंपरा आहे. त्याच पक्षाला दुसर्या वेळी संधी मिळेल असे सहसा होत नाही. त्याच नियमाने त्या राज्यात काँग्रेसची सत्ता होती, ती गेली आणि तिथे भाजपची सरशी झालेली आहे. याला राजस्थानातील नव्या आणि जुन्या पिढीतील संघर्षही कारणीभूत ठरला. अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यातील संघर्षामुळे या राज्यातील काँग्रेसच्या सत्तेचे विमान भरकटले, असे म्हटले तरीही ते वावगे ठरणार नाही. छत्तीसगड हे काँग्रेसच्या ताब्यातील राज्य भाजपला मिळाले आहे.

# अप्परवर्धा धरणग्रस्तांचे प्रतीकात्मक जलाभिषेक आंदोलन



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी –** येथील अप्पर वर्धा धरणग्रस्त पुनर्वसन कृती समितीच्या वतीने आयोजित आत्मक्लेश आंदोलनांतरही प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर कुठलाही तोडगा निघाला नसल्याचा संताप प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. त्यामुळे शासनाच्या या प्रकल्पग्रस्तविरोधी धोरणाविरोधात नागपूर हिवाळी अधिवेशन येथे अप्पर वर्धा घरणग्रस्तांनी प्रतीकात्मक जलाभिषेक आंदोलनाचा पवित्रा घेतला. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी ७ ते ८ डिसेंबर यादरम्यान नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये आपल्या विविध मागणीसह अप्पर वर्धा जलाशयाच्या पाण्याचे पूजन करून पाणी घेतले व कावड़ यात्रेच्या माध्यमातून जलाभिषेक आंदोलन सुरू केले आहे. मागील २०४ दिवसांपासून मोर्शी तहसील कार्यालयाच्या परिसरामध्ये अप्पर वर्धा घरणग्रस्तांचे आत्मक्लेश उपोषण सुरू आहे. सन १९८० मध्ये प्रशासनाकडून जाणीवपूर्वक काही धरणग्रस्तांवर अन्याय होऊन चुका केलेल्या आहे व त्या चुका प्रशासनाने २०२३ मध्ये मान्य सुद्धा केल्या तरी सुद्धा आजपर्यंतयावर तोडगा निघाला नाही. या आत्मक्लेश आंदोलनादरम्यान अपर वर्धा धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतरही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जलसंपदामंत्री, पुनर्वसनमंत्र्यांसह संबंधित अधिकारी यांच्यासोबत उच्चस्तरीय दूसरों व निर्णायक बैठकीचे आयोजन करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली नाही.त्यामुळे अप्पर वर्धा धरणग्रस्त पुनर्वसन कृती समिती व बळीराजा प्रकल्प कृती समिती अमरावती वांनी दोन जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा म्हणून नागपूर अधिवेशनाबर जलाभिषेक आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात साहेबराव विघळे, उमेश शहाणे, अमोल महत्ले, चरण बायस्कर, ज्योतीराम बानेकर, अमोल टाकळे, गजानन पुरी, प्रवीण ढोले, कृष्णा वाचमारे, भाऊराव फुले, प्रशांत राऊत, डॉ. बाळासाहेब कुटेमाटे, मनोज तायडे, पंडागरे, छोटूभाऊ विधळे, केशव गुल्हाने, सुधाकर वेराळे, दामोदर झरवडे, अभिजीत चागडे, ठाकरे, जयसिल मोलव आदींचा सहभाग आहे.

# लोणी टाकळीच्या लाचखोर सरपंचासह सदस्यास अटक

## कंत्राटदाराकडून स्वीकारली ५० हजारांची लाच

**दि.८विदर्भ प्रजासत्ताकअमरावती**दोन गॅबियन बंधारा बांधकामाचे उर्वरित बिल मंजुरीकरिता एमबी बुकावर सही करण्यासाठी एका कंत्राटदाराकडून ५० हजारांची लाच स्वीकारणाऱ्या लोणी टाकळी येथील सरपंचासह सदस्याला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. ही कारवाई मंगळवार, ५ डिसेंबर रोजी जुने भातकुली तहसील कार्यालय परिसरात करण्यात आली.सरपंच विनय प्रमोद बोबडे (३३) व सदस्य रोशन नंदूभाऊ मुंदाने (३५) दोघेही रा. लोणी टाकळी अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

या प्रकरणातील तक्रारकर्ते हे शासकीय कंत्राटदार असून त्यांना मृद व जलसंधारण विभागांतर्गत लोणी टाकळी ग्रामपंचायत येथील २० लाख रुपयांचा दोन गॅबियन बंधारा बांधकामाचा कंत्राट मिळाला होता. सरपंच विनय बोबडे यांनी बांधकामाचे उर्वरित बिल मंजुरीकरिता एमबी बुकावर सही करण्यासाठी बिलाच्या एकूण रकमेच्या ५ टक्केप्रमाणे १ लाख रुपयांची मागणी त्यांच्याकडे केली. याचाबत कंत्राटदाराने २९ नोव्हेंबर रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. तक्रारीवरून करण्यात आलेल्या पडताळणीत तडजोडीअंती ५० हजार रुपये स्वीकारण्याची तयारी सरपंच विनय बोबडे यांनी दाखविली. त्यावेळी सदस्य रोशन मुंदाने यांनी तक्रारकर्ते कंत्राटदार यांना लाच देण्याकरिता प्रोत्साहन दिले. त्यानुसार सापळा रचण्यात आला. सरपंच विनय बोबडे यांनी तक्रारकां कंत्राटदाराकडून ५० हजारांची लाच स्वीकारताच त्यांना अटक करण्यात आली.

## रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाबाबत आढावा बैठक संपन्न

# मराठी भाषा विद्यापीठासाठी भूमी अधिग्रहणास वेग द्यावा

### –उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर –** अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे उभारण्यात येणार्या मराठी भाषा विद्यापीठासाठी भूमी अधिग्रहणाच्या कार्यवाहीला वेग द्यावा, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी येथे आज येथे दिले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था (मॉरिस कॉलेज) येथे आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विभागीय उपायुक्त गजेंद्र बावणे, रिद्धपूर येथील महंत कारंजेकर बाबा, महंत वाईनदेशकर, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव अजित बाविस्कर, सहसचिव प्रताप लुबाळ, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक प्रकाश बच्छाव, डॉ. उमेश काकडे, संतोष चव्हाण, प्रशासन अधिकारी डॉ. प्रभू दवणे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, मराठी भाषा विद्यापीठ सुरू व्हावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून होती. तिचे महत्त्व लक्षात घेऊन शासनाने समिती गठित केली. त्या समितीने अहवाल सादर केला आहे. मराठी भाषा विद्यापीठात विविध ज्ञानशाखा, शिक्षणक्रम आणि अभ्यासक्रम राबविताना विद्यार्थी रोजगारक्षम कसे होतील याचाही विचार करण्यात आला आहे.

मराठी भाषाविद्यापीठासाठी जागा अधिग्रहण करण्याबाबत नियम व अटी तपासून उपविभागीय अधिकारी यांनी तातडीने अहवाल सादर करावा.आणि ही जागा अधिग्रहणाबाबत शेतकऱ्यांना अवगत करावे.असे निर्देशही श्री. पाटील यांनी यावेळी दिले.

महानुभाव गोविंदप्रभू तीर्थस्थान सेवा समिती रिद्धपूर (जि.अमरावती) यांच्या जागेत (कॅम्पस) मध्ये जून २०२४ पासून मराठी भाषा विद्यापीठ सुरू करण्याबाबत ही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.




# केस काळे करण्यासाठी करा जास्वंदीच्या फुलांचा वापर

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक –** केस पांढरे होण्याच्या समस्येला अलीकडे अनेकजण सामोरे जातात. तरुणांमध्ये देखील ही समस्या मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. केस पांढरे होण्यासाठी खराब पाणी, तणाव, अनियमित आहार, अपूर्ण झोप आणि इतर अनेक कारणं असतात. विशेष म्हणजे हे पांढरे केस लपवण्यासाठी छोट्यांपासून ते अगदी मोठ्यांपर्यंत सर्वचजण केसाला कलर करतात.



मात्र, केमिकल कलरशिवायही केस नैसर्गिकरित्या कलर करता येऊ शकतात. जास्वंदीची फूलं केसांना केवळ नैसर्गिक रंगच देत नाहीत, तर केस चमकदार होण्यासाठी देखील मदत करतात.

**असा तयार करा कलर**

जास्वंदीच्या फुलांचा कलर बनवण्यासाठी एका भांड्यात २ कप पाणी गरम करा.

गरम पाण्यात १ कप जास्वंदीच्या फूलांच्या पाकळ्या टाका. १५-१० मिनिटांपर्यंत पाणी गरम करा.

त्यानंतर पाणी थंड करुन, गाळून एका स्प्रे बॉटलमध्ये भरा.

स्प्रे बॉटलमधील कलर केसांना लावण्याआधी केस धुवून घ्या.

त्यानंतर कंगव्याच्या मदतीने कलर संपूर्ण केसांवर लावा. एक तासापर्यंत हा कलर सुकू द्या.

त्यानंतर पाण्याने केस धुवा. केसांना नैसर्गिक कलर करण्यासाठी हा चांगला उपाय ठरु शकतो.

# सुशीला सूर्यवंशी महाविद्यालयात पालक मेळावा



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:**सुशीला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिटय़ूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्टेजमेंट येथे मंगळवार, ५ डिसेंबर रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पालक मेळाव्याची सुरुवात डॉ. पल्लवो मांडवगडे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. विद्यार्थ्यांच्या यशात पालक व शिक्षक यांच्या सहभागाचे अनन्यसाधारण महत्त्व कशा पद्धतीचे असते, हे त्यांनी आपल्या भाषणातून पालकांना पटवून दिले. इंडस्ट्रियल रिलेशन ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंटचेसंचालक प्रा. अमोल करमरकर यांनी एमबीए अभ्यासक्रमाच्या विविध शाखा व प्लेसमेंट प्रक्रिया या विषयावरील सखोल अशी माहिती पालकांना दिली. त्यानंतर पालकांशी संवादात्मक सत्र घेण्यात आले, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. प्रवीण ठोंबरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. संयुक्ता गाठेकर, प्रा. अक्षय उंबरकर, प्रा. रोहन देशमुख यांनी सहकार्य केले.

# मोर्शीत आजपासून चक्रधरस्वामी स्वामी अष्ट शताब्दी महोत्सव



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी १३** श्रीकृष्ण मंदिरात श्री चक्रधर स्वामी अष्ट शताब्दी महोत्सवाचे ८ ते १० डिसेंबर दरम्यान आयोजन करण्यात आले. धांडे ले-आउटस्थित मंदिराजवळ एक एकर परिसरात मंडप उभारण्यात आला असून, पार्किंगची, स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांना अवतार घेऊन ८०१ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने शहरात श्री चक्रधर स्वामी अष्ट शताब्दी महोत्सव होत आहे. सोबतच आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या अवतारदिन महोत्सवात तीनही दिवस महानुभाव पंथाचे महंतगण धार्मिक, सामाजिक प्रबोधन करतील. ८ डिसेंबरला ध्वजपूजन करून कार्यक्रमाची सुरुवात होईल. याच दिवशी कवीश्वर कुलाचार्य श्री दर्यापूरकरबाबा पिढीतील देवपूजा प्रसाद बंदनाचा लाभ होईल. ९ डिसेंबरला सकाळी व्याख्यान माला होईल, सायंकाळी शोभा यात्रा काढण्यात येणार आहे. सायं सात वाजता विशाल जोगदेव नागपूर यांची भक्तिमय भजनसंध्या आयोजित आहे. १० डिसेंबरला प्रबोधन, पंचअवतार उपहार व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. वा सर्व कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन मोर्शी तालुका महानुभाव पंथ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# ३५ गावातील पाण्याचा प्रश्न सुटला

# विक्रम ठाकरे यांच्या लाक्षणिक उपोषणाचे फलित



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक वरुड** अखेर ३५ गावातील लाक्षणिक उपोषणाची दखल घेत पंढरी ३५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु करण्याचे आदेश पारित करण्यात आले. या गावातील पिण्याच्या पाण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. यासाठी समाविष्ट ३५ गावांमधील नागरिकांनी ४ डिसेंबर रोजी गावागावांत एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले होते.

तालुक्यातील ३५ गावाच्या नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत १०० कोटी रुपयांची पंढरी ३५ गावे पाणी पुरवठा योजना मंजूर आहे. यापैकी आतापर्यंत या योजनेतील अर्धे काम करण्यात आले आहे. परंतु कोणत्याही ठोस कारणाशिवाय या योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता यांचय पत्रानव्ये बंद करण्यात आले होते. हे काम सुरू व्हावे यासाठी माजी पं. स. सभापती विक्रम ठाकरे यांनी पुढाकार घेऊन ठिय्या आंदोलनासह समाविष्ट ३५ गावातील नागरिकांनी आपल्या गावातच एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले होते.

या लाक्षणिक उपोषणाची दखल न घेतल्यास व काम सुरू न केल्यास ठाकरे व समाविष्ट गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांनी स्थानिक तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. मात्र त्यापूर्वीच हे काम सुरू करण्याचे आदेश पारित करण्यात आले.

तसे पत्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून संबंधित कंत्राटदारास देण्यात आले. यामुळे आता या ३५ गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. पंढरी ३५ गाव पाणीपुरवठा योजनेमधील सर्व समाविष्ट ३५ गावांतील जनतेच्या सामूहिक प्रयत्नामुळे या लाक्षणिक उपोषण आंदोलनास यश मिळाले आहे. त्यामुळेच हे काम पूर्ववत सुरू होत आहे, असे मत व्यक्त करीत विक्रम ठाकरे यांनी यावेळी ३५ गावांतील जनतेचे आभार मानले.

# दर्यापूरात थरार.... युवती सह परिवारावर गोळीबार



## मुलीच्या कानावर लागली गोळी - प्रकृती गंभीर

### अंजनगाव सुर्जी दर्यापूर रोडवरील घटना

**दि. ८ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर** अंजनगाव सुर्जी येथील रहिवासी असलेले सोळंके कुटुंब आपल्या २६ वर्षीय मुलीसोबत स्वगृही परतत असताना तीन ते चार युवकांनी त्यांच्यावर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना रात्री आठ वाजता उघडकीस आली.या घटनेमध्ये तेजस्वी विश्वजीत राणे यांच्या कानावर गोळी लागली असून देशी कट्ट्याने तीन राउंड फायर केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.तेजस्वी राणे यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना उपचाराकरिता खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आरोपींचा शोध सुरू केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, रामकृष्ण सोळंके,अनिता रामकृष्ण सोळंके, तेजस्वी विश्वजीत राणे व गजानन सुधाकर हूरपडे सर्व राहणार अंजनगाव सुर्जी असे गोळीबार मध्ये जखमी झालेल्यांची नावे आहे.जखमींनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, सोळंके परिवार आपल्या मुलीसह एका प्रकरणात बयान देण्यासाठी अमरावती येथे आले होते.त्यांचे काम आटोपल्यावर सोळंके परिवार सायंकाळी सात वाजता आपली कार क्रमांक एम एच २७ डी एस ८७२१ ने स्वगृही परतत असताना त्यांचा पाठलाग बीएमडब्ल्यू कंपनीच्या एका कार मध्ये असलेले चार



युवक करीत असल्याचे सोळंकी यांच्या लक्षात आले.त्यावेळी ते वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत होते.त्यांनी तात्काळ ११२ वर कॉल करून पोलिसांना ही माहिती दिली.सदर माहितीच्या आधारे पोलिसांनी कुठलाही वेळ न गमावता तात्काळ सोळंके यांच्या मदतीला हजर झाले.पोलिसांच्या मदतीने सोळंके परिवार यांना खोलापूर पोलीस ठाण्यापर्यंत वलगाव पोलिसांनी सोडून दिले त्यानंतर खोलापूर पोलिसांनी दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीपर्यंत सोळंके परिवाराला पोलीस प्रोटेक्शन मध्ये सोडून दिले मात्र या ठिकाणी दर्यापूर पोलीस यांनी पोहोचण्यास विलंब केल्यामुळे बीएमडब्ल्यू कार मध्ये असलेल्या युवकांनी सोळंके



परिवारावर गोळीबार केला.या गोळीबार मध्ये तेजस्वी विश्वजीत राणे यांच्या डाव्या कानाला गोळी लागली.

सोळंके परिवारावर हल्ला करताच बीएमडब्ल्यू कार मध्ये असलेले युवकांनी पळ काढला.तेजस्वी राहणे यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे तसेच सोळंके परिवार व हूरपुडे हे सुद्धा या गोळीबार मध्ये गंभीर रित्या जखमी झाल्याने उपस्थितांनी तात्काळ त्यांना उपजिल्हा रुग्णालयात उपचाराकरिता दाखल केले.घटनेची माहिती दर्यापूर पोलिसांना मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतला तसेच उपजिल्हा रुग्णालयात जाऊन सोळंके यांचे बयान नोंदविले.

सोळंके यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार विश्वजीत राणे व महेश हडदे यांच्यासह अन्य दोघे बीएमडब्ल्यू कार मध्ये त्यांचा पाठलाग करीत होते.

पोलिसांच्या प्रोटेक्शन मध्येच ते अमरावती पासून दर्यापूर पर्यंत आले मात्र दर्यापूर पोलिसांनी विलंब केल्यामुळे त्यांच्यावर घात टाकून बसलेल्या विश्वजीत राणे यांनी त्यांच्यावर गोळीबार केला.सोळंके यांच्या परिवारावर आरोपींनी सतत तीन राऊंड फायर केले. यातील एक गोळी तेजस्वी राणे यांच्या कानशिलात लागलेली आहे.त्यांची प्रकृती गंभीर असून त्यांना अमरावती येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टरांच्या मते सदर गोळीबार देशी कट्ट्यातून झाला असल्याचे त्यांनी प्राथमिक माहितीत सांगितले.पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्याकरिता पथक रवाना केले असून तात्काळ संपूर्ण आरोपी जेरबंद असतील असा कयास पोलीस निरीक्षक टाले यांनी दर्शविला आहे.

# दर्यापूर येथील क्रीडा संकुल बनला आंबट शौकिनांचा अड्डा

### क्रीडा संकुलाची सुरक्षा वाऱ्यावर विविध व्यायामाचे साहित्य नादुरुस्त

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर** दर्यापूर तालुक्यातील क्रीडा संकुलाची सुरक्षा वाऱ्यावर असून .क्रीडा संकुल हे आंबट शौकिनांचा अड्डा बनला आहे. क्रीडा संकुलची उभारणी गेल्या अनेक वर्षापासून झाली आहे . तालुक्यातून मुले पोलीस भरती, सैनिक भरती, सह इतर प्रशिक्षणार्थी मैदानावर आपला सराव करीत असतात. त्याचबरोबर शहरातील क्रीडाप्रेमी , नोकरदार वर्ग सुद्धा आपला सराव,व्यायाम, व सांघिक खेळ खेळत असतात परंतु शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची संख्या अधिक असल्याने मुलांना लाजवणारा परिसर क्रीडा संकुल बनले आहे करोडो रुपये खर्च करून या क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात आली.या संकुलाची देखभाल व सुरक्षा पूर्णपणे वाऱ्यावर आहे अनेक आंबट शौकिनांनी आपला रात्रीचा तळ या ठिकाणी ठोकला आहे सिगारेट दारू गुटखा व इतर अशोभनीय वस्तू या ठिकाणी दिसत आहेत. तरी या संकुलाची देखभाल व सुरक्षितता सफाई पूर्णपणे वाऱ्यावर असल्याचा आरोप क्रीडाप्रेमींनी केला आहे संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश राव जाधव यांनी या



घटनेची तात्काळ दखल घेत योग्य ती कारवाई करावी असे मत सकाळ संध्याकाळ व्यायाम करणे करता येणाऱ्या क्रीडाप्रेमींनी व्यक्त केले-

# अमरावती जिल्हात ओला दुष्काळ घोषित करा

## आ. रवि राणांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, -** जिल्हा ओला दुष्काळग्रस्त घोषित करावा, अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकर्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी, यासह जिल्ह्याच्या विकासासंदर्भात अनेक मागण्या आ. रवि राणा यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन केल्या. सिंभोरा धरणापासून अमरावती शहरापर्यंत नवीन पाईपलाईन टाकण्याकरिता एक हजार कोटी रुपये मंजूर करणे, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या समस्या, नवीन डेपो, कर्मचार्यांच्या मागण्या मंजूर करणे, अमरावती विभाग अंतर्गत



दुष्काळ घोषित करणे, सरसकट शेतकर्यांना आर्थिक मदत देण्याबाबत, कोळी महादेव समाजाच्या जात प्रमाणपत्राची समस्या सोडविणे, चिखलदरा स्कायवॉक सुरू करणे, गणोरी येथील रुग्णालयाच्या इमारतीसाठी निधी मंजूर करणे, शासकीय वैद्यकीय अधिकार्यांच्या मागण्या मंजूर करणे, जिल्ह्यातील रिक्त जागा भरणे, हनुमान गढी भागाता तीर्थक्षेत्र दर्जा देणे, आरोग्य विभागाच्या कर्मचार्यांच्या मागण्या मंजूर करणे, तीर्थस्थळ विकास आराखड्याची अंमलबजावणी करणे, आदी महत्त्वाचे निर्णय घेण्यात यावे यासाठी गुरूवारी रवी राणा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले. यावेळी शेखर बिसने, उमेश ढोणे हजर होते.


# मुंबई न्यायालयाचा अमरावती मनपा ला सवाल

## आता पर्यंत शहरातील अवैध होर्डिंगवर कोणती कारवाई केली?

### १२ डिसेंबर ला अहवाल सादर करण्याचे आदेश

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** शहरातील अवैध होर्डिंग्ज संदर्भात अमरावती महापालिकेस येत्या १२ डिसेंबरला अहवाल सादर करण्या चे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. मनपाने किती कारवाई केली व त्यासंबंधी पोलिसांत किती तक्रारी व गुन्हे दाखल झाले आहेत, याची माहिती विचारली आहे. विशेष म्हणजे गेल्या तीन महिन्यांत मनपाने तीन एकआपआर केले असून त्यामध्ये सर्वाधिक होर्डिंग्ज असलेल्या - मध्य झोनमधून एकही कारवाई नाही. २०११ मध्ये सातारा येथील मुसुराज्य सामाजिक संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात महाराष्ट्र विद्रीकरण अधिनियमातील तरतुदींच्या अनुषगाने मुंबईच्या जनहित याचिका दाखल केली आहे. या पाचिकेवरील कारवाई दरम्यान सर्व महापालिकांना त्रेमासिक अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.गेल्या तीन महिन्यांत अमरावती महापालिकेच्या क्षेत्रात तीनच एफआयआर दाखल झाले आहेत. हे एफआय आर दस्तुरनगर, रामपुरी कॅम्प व बडनेरा या झोनमधील आहेत. शहरातील सर्वाधिक होर्डिंग्जची संख्या असणाऱ्या





मध्य झोनमधून एकही कारवाई करण्यात आलेली नाही. पाचही झोनमधून २०११ पासून आता पर्यंत ६० एफआयआर दाखल झाले आहेत परिसर मध्य झोप अंतर्गत येतो मात्र या झोनमध्ये कारवाई झालेली नाही. बहुतांश होर्टिस राजकीय पक्षांचे राहत



असून ते काढण्यास मापाचे कर्मचारी धजावत नाहीत. राजकीय दबावापुढे त्यामुळे जागोजागी होर्डिंग्र लागलेले असून शहर विदूर आले आहे, पराला आता १२ डिसेंबरला पालमात अहवाल सादर करायचा असून न्या. रफिक डॉक्टर व न्या.देवेंद्र उपाध्याय आहे

# बहारदार नृत्याविष्काराने रंगला कौंडण्यपूरचा अंबा रुख्मिणी महोत्सव २०२३

## महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा ठरला यात्रेमधील विशेष आकर्षण

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक कौंडण्यपूर** -नुकत्याच संपन्न झालेल्या कौंडण्यपूर येथील अंबा रुख्मिणी महोत्सव २०२३ मध्ये दिनांक ३ डिसेंबर रोजी सायंकाळी स्थानिक कलावंतांच्या बहारदार नृत्याविष्काराने एकच रंगत आणली. एकाहून एक नृत्य सादर करीत चिमुकल्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यात्रा परिसरात पहिल्यांदाच बालकलाकारांचे नृत्याविष्कार बघून यात्रेकरूंनी कौतुकाची थाप दिली. या सांस्कृतिक सोहळ्याला विशेष अतिथी म्हणून वंचित बहुजन आघाडी युवा प्रदेशाध्यक्ष निलेश विश्वकर्मा, तिवसा पंचायत समिती उपसभापती सौ. रोशनी ताई पुनसे, अध्यक्षस्थानी सौ. सरितााताई राऊत, मुकुंदजी पुनसे, पंकज कळंबे, दिनेशराव ठाकरे, उत्सव समिती अध्यक्ष अमोल भाऊ शेंडे, सल्लागार समिती अध्यक्ष बाळूभाऊ ठाकरे, उपाध्यक्ष मैताब शाह, रुख्मिणी सहकार्य युवक मित्र मंडळ अध्यक्ष अमोल पुंडेकर, उत्सव समिती सचिव सचिन करडे, उपाध्यक्ष प्रयास भाकरे आदींची उपस्थिती होती. सर्वप्रथम अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे अक्षय पुंडेकर यांनी आपल्या संचालनातून मान्यवरांचे स्वागत करीत या महोत्सवामध्ये सादर होत असलेल्या कलाविष्काराबाबत माहिती दिली. तर ह. भ. प. संजय महाराज ठाकरे यांनी आपल्या प्रास्ताविकातून महोत्सवाची पार्श्वभूमी व आयोजन समितीच्या विशेष परिश्रमाबद्धल मान्यवरांना अवगत केले. स्थानिक कलावंतानी सादर केलेल्या नृत्याविष्काराचे मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुख्मिणी महोत्सव हे युवकांच्या कलेला प्रोत्साहन देणारं हक्काचं व्यासपीठ




असून या व्यासपीठावरून मोठे कलाकार उदयास येतील, या शब्दात विशेष अतिथी म्हणून लाभलेले निलेश विश्वकर्मा यांनी महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. तर उपसभापती सौ. रोशनीताई पुनसे यांनी सुद्धा आपल्या मनोगतामधून शुभेच्छा दिल्या. तर उपसरपंच सौ. सरितााताई राऊत, यांनी सदर महोत्सवाबाबत गौरवोद्गार काढत, या महोत्सवामुळे कौंडण्यपूर च्या यात्रेत आणखी भर पडत असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता अक्षय पुंडेकर यांच्यासह उत्सव समिती अध्यक्ष अमोलभाऊ शेंडे, सल्लागार समितीअध्यक्ष बाळूभाऊ ठाकरे, सचिव गजाननराव बांबल, उपाध्यक्ष मैताब शाह, दिनेशभाऊ ठाकरे, तंटामुक्ती अध्यक्ष अंकुश देऊळकर, रुख्मिणी सहकार्य युवक मित्र मंडळ अध्यक्ष अमोल पुंडेकर, उत्सव समिती सचिव सचिन करडे, उपाध्यक्ष प्रयास भाकरे, श्री गजाननराव ठाकरे, श्रीरामजी पुंडेकर, निखिल ठाकरे, मुकेश पवार, स्वप्नील खेडकर, आकाश ठाकरे, प्रशांत ठाकरे, दीपक केवदे, शुभम बोके, आनंद मनोहर, अंकुश पुंडेकर, प्रतीक कदम, वैभव ठाकरे, श्रीकांत खंडारे, प्रदीप सुरजुसे, यश बाहे, लकी नेमाडे, प्रथमेश ठाकरे, विशाल खंडारे, सुरज केवदे, राज भोसले, अर्पित डुबे, कुणाल पुंडेकर, तेजस आसेकर, सार्थक ठाकरे, सौरभ ठाकरे, दक्ष खंडारे, ओम राऊत, प्रतीक नेवारे, चेतन नेमाडे, तसेच महिला समितीच्या अश्विनी विलायतकर, स्वेता बांबल, राधा महल्ले, पूनम ठाकरे, नूतन ठाकरे, देवयानी ठाकरे, पूर्वा अर्मळ, वैष्णवी डुबे, राधा ठाकरे, गुंजन खंडारे, अमु बांबल, ख़ुशी केवदे, तसेच उत्सव समिती, सल्लागार समिती व महिला समिती च्या सर्व सदस्यांनी अथक घेतले. कार्यक्रमाचे संचालन अक्षय पुंडेकर तर आभार प्रदर्शन स्वेता बांबल यांनी केले.

# संजय राऊतांचा बळीचा बकरा पक्षश्रेष्ठींनीच केलाय

## निलम गोऱ्हेंची नाव न घेता ठाकरेंवर सडकून टीका

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** संजय राऊत यांना पक्षाने बळीचा बकरा बनविले, असे स्पष्ट मत विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी मांडले. नागपूर प्रेस क्लब तर्फे आयोजित 'मिट द प्रेस' कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीपकुमार मैत्र यांनी गोऱ्हे यांचा बुके देऊन स्वागत केले. श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रम्हाशंकर त्रिपाठी यांनी प्रस्तावणा केल्यानंतर गोऱ्हे यांनी नागपूर - विदर्भाशी असलेले नाते, येथील हिवाळी अधिवेशन आणि भूमीका यासंबंधाने त्या सविस्तर बोलल्या. त्यानंतर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवरही त्यांनी आपली मते व्यक्त केली. बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, एकनाथ शिंदे, मनोहर जोशी, संजय राऊत अशा अनेकांसंदर्भात त्या मोकळेपणाने बोलल्या.



प्रत्येक राजकीय नेत्याची शैली वेगळी असते. शिवसेना प्रमुखांची वेगळी होती. त्यावेळी कठोर शिस्त होती. त्यांना बारिक माहिती असायची. आमच्याकडे २०१५ नंतर कार्यपद्धती बदलली. मला एक्सेस होता. मात्र, प्रश्न घेऊन जाणाऱ्या अनेक बड्या नेत्यांना न्याय मिळत नव्हता. नेत्यांना काम करू देत नव्हते. अपमाणित केले जायचे. त्यांना मुद्दामहून बाजुला टाकले जायचे. मनोहर जोशींच्या बाबतीत हेच झाले.

शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आजारी पडल्यानंतर पक्षात काय सुरू आहे, हे कळतच नव्हते. पक्षश्रेष्ठींना हवे असलेले संजय राऊत यांच्याकडून बोलून घेतले जायचे. त्यांच्याबद्दल आदर असला तरी त्यांची शब्दप्रणाली पटत नव्हती. त्यामुळे आपण त्यांना जेलमधून आल्यानंतर समजावल देखिल. आक्रमक बोलण्यापेक्षा वैचारिक मतभेद वेगळ्या पद्धतीनेही मांडता येतात. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाले. नंतर राऊत यांना बळीचा बकरा बनविल्याचे लक्षात आले.

**शक्ती कायदा त्रुट्यांमध्ये अडकला-** महिला मुलींवर होणाऱ्या अत्याचारांचा मुद्दा आणि शक्ती कायद्यासंबंधाने प्रश्न आले असता गोऱ्हे यांनी हा कायदा त्रुट्यांमध्ये अडकल्याचे सांगितले. अल्पवयीन मुलांना चुकीच्या व्यवसायात ढकलणारे रॅकेट सक्रिय आहेत. हे सगळं थांबविण्यासाठी पोलिस प्रशासन कमी पडत आहे. या संबंधाने अन्य संस्थांमध्येही अनास्था दिसते', असे नीलम गोऱ्हे म्हणाल्या. पूर्वी महिलांवर होणाऱ्या अन्यायाला गांभीर्याने घेतले जात नव्हते. मात्र आता महिला आपल्या हक्कासाठी सजग होत आहेत. अडचणीत असणाऱ्या महिलांसाठी भरोसा सेल आणि ११२ क्रमांक महत्त्वाचे ठरत आहे, असेही त्या म्हणाल्या.

### साहेब म्हणतील त्याला हो म्हणायचे

साहेब म्हणतील त्याला हो म्हणायचे हीच पक्षाची शिस्त होती. आदित्य ठाकरे यांच्याबद्दल चांगल्या भावना आहेत. मात्र बड्या नेत्यांपेक्षा त्यांनाच जास्त निमंत्रण मिळत होते. जनाधार असलेल्या नेत्यांना डावलले जात असल्याने खटकू लागले. आता जे प्रकरण कोर्टात आहे, कुठले रेकॉर्ड नाहीत. कुणाला कशासाठी निवडल ते माहित नाही. बऱ्याच वेळी कोऱ्या पेपरवर सह्या घेतल्या जातात. आता अनेक त्रुटी उघड झाल्याचे त्या म्हणाल्या.

### शिंदेंच्या नाराजीची कल्पना होती

कोव्हिडमध्ये शिंदे यांच्यावर मोठी जबाबदारी होती. मात्र, त्यांना कामच करू दिले जात नव्हते. उद्धव ठाकरे आजारी पडल्यानंतर संवाद हरविला. पारदर्शिपणाही दिसून येत नव्हता. कोव्हीड कमी झाल्यानंतर या सर्व बाबी जाणवायला लागल्या. डावलले जात असल्याची अनेकांची भावना झाली. कालांतराने पक्षाची कार्यपद्धती बदलली. एकनाथ शिंदे यांनी आपल्याकडे भावना व्यक्त केल्या होत्या. त्यावरून ते नाराज असल्याची कल्पना होती. मात्र, पक्षात फुट पडल्यानंतर महिना-दोन महिने सून्न पडल्यासारखे झाले होते.

# संजय राऊतांविरोधात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार

### आरोग्य मंत्री तानाजी सावंतांचा इशारा

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर:** राज्यातील आरोग्य खात्यातील बदल्यांसाठी पारदर्शक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. आपण आरोग्य मंत्री पदाचा कारभार स्विकारल्यानंतर फेसलेस या पारदर्शक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या पारदर्शक कारभारामुळेच आता राज्यातील आरोग्य खात्यातील सर्व बदल्या या फक्त योग्य निकशावरच होत आहेत. शिवाय या नव्या पारदर्शक प्रणालीमुळे आरोग्य खात्यातील बदल्यांचे अधिकार माझ्याकडे नाहीतच , असे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी सांगितले आहे.

आरोग्य विभागामध्ये संचालकांची पदं भरली नाहीत, बदल्यांच्या बाबतीत गैरव्यवहार झाला असा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला होता. संजय राऊत यांच्या आरोपानंतर तानाजी सावंत यांनी आपली भुमिका स्पष्ट केली आहे.आरोग्य विभागामध्ये बदल्यांसाठी आणि नियुक्ती मिळवण्यासाठी मोठा आर्थिक गैरव्यवहार सुरु असल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला होता. त्यांच्या सगळ्या आरोपांना आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी उत्तर दिलं आहे . नागपूरच्या रविभवन येथे आयोजित पत्रकार परिषदेमधून त्यांनी आरोप खोडून काढले.

२०१२ पासून आतापर्यंत आरोग्य विभागाची बिंदुनामावलीच तयार नाहीये. संजय राऊत हे ते तीन ते चार टर्म खासदार आहेत आणि पत्रकारही आहेत. त्यांनी बिंदुनामावलीचं महत्व ओळखलं पाहिजे. समाजकल्याण विभागाने आम्हाला त्याबाबत मागणी केली होती, त्याशिवाय सध्याची भरती झाली नसती. परंतु मी विनंती केली आणि तीन महिन्यांच्या अटींवर भरती प्रक्रिया सुरु केली.'' असं सांगत तानाजी सावंत यांनी राऊतांचे इतरही आरोप खोडून काढले.



आरोग्य विभागामध्ये संचालकांची पदं भरली नाहीत, बदल्यांच्या बाबतीत गैरव्यवहार झाला असा आरोप संजय राऊत यांनी केला होता. वास्तविक ११ मे २०२३ रोजी बदल्यांचे सर्व अधिकार आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. शासन निर्णय १७ मे २०२३ नुसार ऑनलाईन बदल्या किंवा विनंती बदल्यांचे अधिकार मी प्रशासनाला दिलेले आहेत. भरती प्रक्रिया किंवा बदली प्रक्रिया पारदर्शकपणे सुरु आहेत.. सीएसआर फंडातून ॲपची निर्मिती झाली आणि बदली पारदर्शकपणे होऊन गट अ ते गट क यांच्या ७ ते ८ हजार बदल्या झाल्याचं सावंतांनी सांगितलं. मंत्री सावंत यांनी पुढे सांगितलं की, मागच्या सरकारमध्ये भरती प्रक्रियेत कसा गोंधळ झाला, हे सर्वांनाच माहिती आहे. यावेळची भरती मात्र अत्यंत पारदर्शकपणे सुरु आहे. दररोज मी आरोग्य खात्याच्या भरती संदर्भातील परिक्षेचे पेपर संपल्यानंतर याबद्दल माहिती घेत असतो असेही आरोग्य मंत्री तानाजी सावंत म्हणाले.

# केंद्र सरकारचा इथेनॉल बंदीचा निर्णय तुघलकी; राजू शेट्टी

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक कोल्हापूर:** केंद्र सरकारने इथेनॉलच्या उत्पादनावर घातलेली बंदी म्हणजे तुघलकी निर्णय असून हे आम्हाला कदापि मान्य नाही. देशात साखर कमी पडून साखरेचे दर वाढतील या भितीने केंद्राने इथेनॉल निर्मितीवरील घातलेली बंदी तातडीने मागे घ्यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केली. याबाबत शेट्टी म्हणाले की, केंद्र सरकारने साखर उद्योगातील खासगी आणि सहकारी साखर कारखान्यांना प्रोत्साहन , सबसिडी व व्याजामध्ये सवलत देऊन इथेनॉलचे प्रकल्प उभे करण्यास सांगितले. साखर उद्योगाला चालना मिळावी यासाठी केंद्राने इथेनॉल निर्मितीला चालना दिली. यामुळे कोट्यवधी रूपयांचे भाग भांडवल देशातील साखर उद्योगाने यामध्ये गुंतवले आहेत.असे असताना देशात साखर कमी पडते म्हणून अचानक केंद्र सरकारने



इथेनॉलच्या उत्पादनावर बंदी घातलेली आहे. याचा थेट परिणाम शेतकर्यांच्यावर देखील होणार आहे. केंद्र सरकार ही बंदी घालून शांत बसेल. मात्र इथेनॉलमध्ये साखर कारखान्यांनी अब्जावधी रूपये गुंतवले आहेत, त्याचे काय होणार आहे. याचे उत्तर केंद्र सरकारकडे नाही.देशात यंदा साखरेचे उत्पादन कमी होणार आहे. त्याला केंद्र सरकारचे धोरण कारणीभूत आहे. पुढील वर्षीही साखरेची परिस्थिती याहून अधिक गंभीर परिणाम होणार आहे. देशातील उसाचे क्षेत्र कशामुळे कमी झाले आहे. याच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे आहे. रासायनिक खतांच्या किंमती प्रचंड वाढलेल्या आहेत. उत्पादन खर्च वाढलेला आहे. शेतकऱ्यांना उसाची शेती परवडत नाही. देशात दुष्काळाचे सावट आहे. अशा परिस्थितीमध्ये देशातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने तातडीने आर्थिक सहाय्य करणे गरजेचे आहे. त्यांना ऊस लागवडीमध्ये प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. तरच देशातील उसाचे उत्पादन वाढून साखर उत्पादीत होणार आहे. केंद्राने घेतलेला हा विदुषकी निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी शेट्टी यांनी केली आहे.

# अर्जुन मुंडा भारताचे नवे कृषीमंत्री

## नरेंद्र सिंह तोमर यांच्यासह दोन मंत्र्यांचे राजीनामे मंजूर

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक नवी दल्ली –** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केंद्रीय मंत्री नरेंद्र सिंह तोमर, प्रल्हाद सिंह पटेल आणि रेणुका सिंह सरुता यांचे राजीनामे स्वीकारले आहेत. आता केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा यांच्याकडे कृषी मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. तर राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांच्याकडे अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या राज्यमंत्रिपदाचा



अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांच्याकडे जलशक्ती मंत्रालयाच्या राज्यमंत्रिपदाचा



अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. राज्यमंत्री भारती प्रवीण पवार यांच्याकडे आदिवासी व्यवहार मंत्रालयात राज्यमंत्री म्हणून अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

# आमदार अपात्रता सुनावणी लांबणीवर ? ; विधानसभा अध्यक्ष सुप्रीम कोर्टाकडे वेळ मागणार

## अधिवेशनकालीन निवासस्थानी अनौपचारिक संवादावेळी विधानसभा अध्यक्षानी सुनावणी विषयी दिली माहिती

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाबरोबर आमदार अपात्रता सुनावणीलाही सुरुवात झाली आहे.

यासाठी आपल्याला विधानसभा आणि सुनावणी असे बारा बारा तास काम करावे लागणार आहे. शनिवार-रविवारीही सुनावणी घेणार असून दोन्ही पक्षकाराकडून सहकार्य झाल्यास वेळेत सुनावणी पूर्ण करता येईल. मात्र अजूनही अर्ज दाखल केले जात असून सुनावणीसाठी अधिक वेळ लागल्यास आणि ३१ डिसेंबर आधी सुनावणी पूर्ण करणे शक्य न झाल्यास सर्वोच्च न्यायालयाकडे वेळ मागितला जाईल, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

नागपूर येथील सुयोग या पत्रकारांच्या अधिवेशनकालीन निवासस्थानी अनौपचारिक संवादावेळी विधानसभा अध्यक्षानी सुनावणी विषयी माहिती दिली.

न्याय संस्था आणि



विधिमंडळ या दोन्ही संस्था आपापल्या कार्यकक्षेत राहून काम करीत आहेत.

यात अंतिम शब्द कोणाचा असेल असे होत नाही. त्यामुळे न्यायालयाने ३१ डिसेंबरपर्यंत सुनावणी पूर्ण करून निर्णय देण्यास सांगितले आहे त्यानुसार वेगाने सुनावणी पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. मात्र तरीही अधिक वेळ लागण्याची शक्यता निर्माण झाल्यास न्यायालयाला कळवले जाईल.

आमदार अपात्रता सुनावणीसाठी ट्रिपल ओव्हर टाइम करू.

राष्ट्रवादी बाबत ज्या याचिका दाखल झाल्या आहेत. त्याची उत्तरे आली आहेत. लवकरच याबाबत सुनावणी सुरू करू, असं नार्वेकर म्हणाले.

### ... म्हणून राष्ट्रवादीला एकच कार्यालय

राष्ट्रवादीच्या कार्यालयावर नार्वेकर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी एक विधिमंडळ कार्यालय दिले आहे. राष्ट्रवादीत दोन गट आहेत, अशी माहिती माझ्यापर्यंत आलेली नाही. तसे कोणतेही निवेदन देण्यात आलेले नाही. त्यामुळे हे कार्यालय एकत्र आहे. आम्हाला वेगळा गट ठरवावा, असे माझ्याकडे निवेदन आलेले नाही. तसं निवेदन आले तर बघू, असं म्हणालेत.

### राष्ट्रवादीच्या विप आमदारांनाही नोटीस

ठाकरे गटाने डॉ. गोऱ्हे, मनीषा कायंदे व विप्लव बजोरिया यांना अपात्र ठरविण्यासाठी याचिका सादर केल्या आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सतीश चव्हाण, अमोल मिटकरी, विक्रम काळे, अनिकेत तटकरे आणि जितेंद्र आव्हाड यांनी रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या विरोधात याचिका सादर केल्या आहेत. या दोन्ही याचिकानबाबत बोलताना उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी. शिवसेना ठाकरे गटाच्या याचिकेत माझे नाव असल्याने ही सुनावणी मी घेणार नाही. त्यामुळे कधी होणार हे सांगू शकत नाही. मात्र अपात्रतेसंदर्भात राष्ट्रवादीच्या आमदारांना गुरुवारी म्हणजे आजच नोटीस पाठवण्यात येईल, असे नीलम गोऱ्हे म्हणाल्या.

# फडणवीसांचं पत्र अन् नवाब मलिकांच्या भूमिकेवर अजित पवार गटाचं स्पष्टीकरण

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई –** महाराष्ट्राचे हिवाळी अधिवेशन नागपूरात सुरु झाले असून अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलीच जुंपल्याचं पाहायला मिळालं. राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांच्या भूमिकेवरुन सत्ताधारी महायुतीवर विरोधकांनी जोरदार टीका केलीय. कारण, सत्ताधारी राष्ट्रवादी गटाच्या बाकावर नवाब मलिक बसले होते. त्यानंतर, विरोधकांनी देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केलं. त्यामुळे, फडणवीसांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्र लिहून भूमिका मांडली. नवाब मलिक यांना महायुतीत



घेता येणार नसल्याचं स्पष्ट केलं. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडूनही याबाबत भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. देशद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा भोगत असलेले आणि सध्या जामिनावर बाहेर असलेले राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक अधिवेशनात उपस्थित राहिले. यावेळी ते सत्ताधाऱ्यांच्या म्हणजे अजितदादांच्या गटातील आमदारांसोबत बसले. हा प्रकार पाहून विरोधकांनी गोंधळ केला आणि नवाब मलिकांबाबत काही सवाल उपस्थित केले. त्यानंतर, देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे प्रमुख नेते अजित पवार यांना पत्र लिहून नाराजी व्यक्त केली आहे. फडणवीसांच्या पत्रानंतर आता राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी नवाब मलिक यांच्याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. आम्ही नवाब मलिक यांच्याशी कुठलीही राजकीय चर्चा केलेली नाही. विधानसभेत आल्यानंतर जुन्या सहकार्यांशी त्यांचा संवाद आणि भेट होणे स्वाभाविक आहे, असे तटकरे यांनी म्हटले.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर

## मौदा तालुक्यातील तारसा, निमखेडा या गावांना त्यांनी भेटी

**दि.८विदर्भ पप्रजासत्ताक नागपूर:** नागपूर जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची गुरूवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. मौदा तालुक्यातील तारसा, निमखेडा या गावांना त्यांनी भेटी दिली.नागपूर जिल्ह्यामध्ये या पावसात जवळपास १२४ गावांना फटका बसला आहे ८५२ हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले असून सर्वाधिक नुकसान मौदा तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे झाले आहे. मौदा तालुक्यात रामटेक पारशिवणी तालुक्यातही नुकसान झाले आहे. जिल्ह्यात धानासोबतच कापूस तूर संत्रा पिकांचे नुकसान झाले आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन



झालेल्या नुकसानाची पाहणी केली.यावेळी त्यांनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची चर्चा केली. विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.-

# पालकमंत्र्यांच्या कामाचे श्रेय आमदार राणानी लाटू नये

## तुषार भारतीय यांचा आ.राणांना सल्ला : भाजप पदाधिकाऱ्यांच्या परिश्रमाने मिळाला २३५ कोटींचा निधी

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती महानगरपालिकेला राज्य शासनाकडून २३५ कोटींचा निधी शहरातील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी नुकताच प्राप्त झाला आहे. शहरातील रखडलेल्या मुलभूत सुविधांच्या विकासासाठी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी महापालिकेतघेतलेल्या आढावा बैठकीनंतर नगरविकास विभागाच्या सचिवांसोबत मनपा आयुक्तांसह बैठक घेऊन रखडलेल्या विकासकामांच्या पूर्तीसाठी तातडीने २३५ कोटींचा निधी मंजूर करून घेतला आहे. भारतीय जनता पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी तुषार भारतीय तसेच नगरसेवकांनी सातत्याने

पुढाकार घेऊन हा निधी आणला असून त्याचे फुकटचे श्रेय आमदार रवी राणा यांनी घेऊ नये, असा सल्ला तुषार भारतीय यांनी दिला आहे.पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील हे अमरावती येथे नियोजन बैठकीसाठी आले असता त्यांनी या बैठकीनंतर अमरावती महानगरपालिकेत विविध विकासकामांचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने बैठक घेतली होती. या बैठकीला खा.डॉ.



अनिल बोंडे, आ. प्रवीण पोटे पाटील, माजी महापौर चेतन गावंडे, माजी स्थायी समिती सभापती तुषार भारतीय यांच्यासह शहरातील भाजपा नगरसेवकांची उपस्थिती होती. यावेळी अमरावती शहरात निधीअभावी अनेक मुलभूत सुविधांची कामे रखडली असल्याचेत्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. मनपा तसेच जीवन प्राधिकरणाकडून नेरपिंगळाई ते अमरावती शहरापर्यंतच्या पाईपलाईनसाठी ६०० कोटींचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. एकवेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी आणणे कठिण असल्याने टप्प्याटप्प्याने हे काम मार्गी लागले यासाठी प्रयत्न करण्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी मान्य केले. अमरावती शहरात प्राधान्याने जी कामे करावयाची आहेत, त्यासाठी प्राथमिक स्तरावर तातडीने २५० कोटींच्या निधीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करून तो मंजूर करून आणण्यासाठी नगरविकास विभागाच्या सचिवांशी मंत्रालयात मनपा आयुक्तांसोबत बैठक लावून घेतली. पालकमंत्री पाटील यांनी स्वतः पुढाकार घेऊन हा निधी मंजूर करवून घेतला आहे.मात्र निधी मंजूर झाल्याची माहिती होताच त्याचे फुकटचे श्रेय घेण्यासाठी आ. राणा केंनी प्रयत्न चालविले आहेत. खा. बोंडे, आ. प्रवीण पोटे आणि तुषार भारतीय या स्थानिक नेत्यांनी प्रत्येक पातळीवर प्रयत्न करून हा निधी मंजूर करून घेतला असून अद्याप तो निधी प्राप्त व्हायचा आहे. निधी प्राप्त झाल्यानंतर अमरावती शहरात विकासाला मोठी गती प्राप्त होईल, असे तुषार भारतीय यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.अमरावती शहरात विकासकामांसाठी आजवर भाजपाच्या नेत्यांनी मोठ्या प्रमाणावर निधी आणला असून पुढेही शहराचा कायापालट करण्यासाठी आम्ही कायम प्रयत्नरत आहोत. शासनाच्या स्तरावर काम करून निधी आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करायचे आणि कुणीतरी मध्येच येऊन त्याचे श्रेय घेऊन जायच, असा प्रकार यापुढे होऊ देणार नाही, असा सल्ला देखील तुषार भारतीय यांनी आ. रवी राणा यांना दिला आहे.

# साफसफाई कंत्राट निविदेत ४० लाखांचा अपहार

## अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा युवा सेनेची पोलिसात तक्रार

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती महानगरपालिकेत झोननिहाय साफसफाई कंत्राटाच्या निविदा प्रक्रियेत ४० लक्ष रुपयांचा आर्थिक अपहार झाल्याचा आरोप युवा सेनेचे समन्वयक राहूल माटोडे यांनी केला असून याबाबत गुरुवारी (ता. सात) दुपारी त्यांनी कोतवाली ठाण्यात तक्रार दिली.

अमरावती म.न.पा. क्षेत्रातील साफसफाईसाठी एकूण ५ झोनसाठी कंत्राटाची निविदा काढण्यात आलेली होती. त्याम ध्ये विशिष्ट कंत्राटदारांना निविदा मिळावी म्हणून विशिष्ट अटी शर्ती टाकून नियमबाह्यरित्या पूर्वीचा कंत्राट संपुष्टात येण्यापूर्वीच म्हणजेच ६ महिन्यापूर्वीच सदर कामाचे कार्यादेश देण्यात आले. सदर साफसफाईचे ५ झोनचे कंत्राट निविदेप्रमाणे ३ वर्षासाठी जवळपास १२० कोटी रुपयांसाठी बोलाविण्यात आले होते. परंतु या कामाचे कार्यादेश देतांना सदर काम ५ वर्षाच्या आ कालावधीसाठी देण्यात आले.



दिन त्याची किंमत जवळपास २०० कोटी रुपये आहे. वास्तविक उ सदर कार्यादेश देण्यापूर्वी म् शासकीय नियमाप्रमाणे निविदा नि किमतीच्या कमीतकमी १ टक्का सुरक्षा रक्कम जमा करण्याची तरतूद आहे. यानुसार ५ झोनच्या कंत्राटदारांकडून जवळपास दोन कोटी रुपये म.न.पा. च्या तिजोरीत सुरक्षा रक्कम जमा करणे आवश्यक होते. परंतु अशी कोणतीही सुरक्षा रक्कम सदर कार्यादेश देण्यापूर्वी जमा करण्यात आलेली नाही. याउलट या कामाच्या निविदेसोबत भरण्यात आलेली इसारा रक्कम (ई.एम.डी.) जी सुरक्षा रकमेचा भाग असते ती जवळपास ४० लक्ष रुपये कार्यादेश (वर्क ऑर्डर) दिल्याच्या दुसऱ्याच दिवशी कंत्राटदारांना परस्परआर्थिक संगनमत करुन परत दिल्याची माहिती असून त्याबाबतचे सर्व पुरावेसुध्दा उपलब्ध असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मनपातील आरोग्य विभागातील पी.टी. चव्हाण आणि उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी कंत्राटदाराला लाभ पोहचविण्यासाठी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन ४० लाख रुपये कंत्राटदाराला परत केले. ही बाब अतिशय गंभीर असून यामध्ये दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आर्थिक अपहार केल्याप्रकरणी तत्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी युवासेना अमरावती समन्वयक राहुल माटोडे यांनी केली. यावेळी राहूल माटोडेसह सनिल राऊत, सचिन ठाकरे, सुधीर ढोके, मिथून सोळंके, कार्तिक गजभिये, पंकज फुके, शैलेषसिंग चव्हाण आदी उपस्थित होते.

# यशोमतीताई ठाकूर तालिका अध्यक्षांच्या यादीत

## विधांसामाध्यक्षांकडून नियुक्ती जाहीर

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला गुरूवारपासून (ता. सात) नागपूर येथे सुरुवात झाली. विधानसभा कामकाजासाठी तालिका अध्यक्षांची नियुक्तीअध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सभागृहात जाहीर केली. विधानसभा तालिका अध्यक्षपदी सदस्य संजय शिरसाट, समीरकुणावार, चेतन तुपे आणिॲड. यशोमती ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आल्याचे अध्यक्ष ॲड नार्वेकर यांनी जाहीर केले.



# विधिमंडळ परिसरात 'लोकराज्य' चे प्रदर्शन : महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते उद्घाटन



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनानिमित्त 'लोकराज्य' मासिकाचे प्रदर्शन विधिमंडळ परिसरात लावण्यात आले आहे. या दालनाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते करण्यात आले.

महासंचालनालयाचे संचालक (माहिती व प्रशासन) हेमराज बागुल, संचालक (माहिती) डॉ. राहुल तिडके, उपसंचालक (वृत्त) दयानंद कांबळे यावेळी उपस्थित होते. 'लोकराज्य' मासिक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित होत असून त्यास सात दशकांची परंपरा लाभली आहे. हे मासिक राज्याचाजडणघडणीचा साक्षीदार ठरले आहे. महत्त्वपूर्ण घडामोडी, मंत्रिमंडळ निर्णय, माहितीपूर्ण विशेषांक विविध क्षेत्रातील माहितीचा खजिना म्हणून लोकराज्य ओळखले जाते. विश्वासार्ह माहितीमुळे हे मासिक सर्वसामान्य वाचकांसोबतच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी उपयुक्त ठरले आहे. या प्रदर्शनात १९६४ पासूनचे दुर्मिळअंक ठेवण्यात आले आहेत. तसेच विविध विशेषांकही येथे पाहण्यासाठ उपलब्ध आहेत. शासनाच्या विविध योजनांची माहिती व्हावी आणि हा अंक जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचाव यासाठी 'लोकराज्य' प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. जिल्हा माहित अधिकारी प्रवीण टाके यांनी यावेळ प्रदर्शनाची माहिती दिली.

# स्वतंत्र विदर्भासाठी विदर्भ आंदोलन समितीचा १४ डिसेंबरला चक्काजाम

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्वतंत्र विदर्भाच्या निर्मितीसाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. गुरुवारी समितीच्या कोअर कमिटीच्या बैठकीत निर्णायक आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.१४ डिसेंबरला महाराष्ट्र छत्तीसगड सीमेवरील गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यातील दुर्गम भागातील बोटेकमा या गावाजवळील रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन केले जाणार आहे. तर २० डिसेंबरला अकोला येथे पश्चिम विदर्भाचा विदर्भ निर्माण संकल्प मेळावा आयोजित केला जाणार असल्याची माहिती समितीचे नेते माजी आमदार वानराव चटप यांनी दिली.संसदेच्या हिवाळी अधिवेशनात केंद्र सरकारने स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची घोषणा करावी याकरिता स्वतंत्र विदर्भ





राज्याचा केंद्र सरकारने निर्णय घ्यावा याकरिता आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.


बैठकीला कोअर कमिटीचे सदस्य अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. जी. एस. ख्वाजा, प्रा. प्रभाकर कॉडबत्तुनवार, तात्यासाहेब मते, जिल्हा उपाध्यक्ष गुलाबराव धांडे, राजेंद्र आगरकर, अशोक पोरेड्डीवार, ओमप्रकाश तापडिया, कैलाश फाटे, उल्हास कोटमकर, अंकुश वाघमारे, भाऊराव वानखेडे, गजानन अहमदाबादकर, गोविंद चव्हाण, विष्णुपंत आश्तीकर, सुनीता येरणे, रेखाताई निमजे, ज्योतीताई खांडेकर, मनीषा तिरपुडे, ॲड. मृणाल मोरे, दिलीप भोयर, सुनील चोखारे, धनंजय धार्मिक, अय्यरताई, नीलकंठ घवघवे, अयुब शेख, रमेश नळे, घीसू पाटील खुणे, राजकुमार शेंडे, गणेश शर्मा, नरेश निमजे शहर अध्यक्ष, डॉ. रामकृष्ण पौनीकर, सचिन लोणकर, विजय मौडेकर, अण्णाजी राजेधार, गणेश शर्मा, विठ्ठलराव मानेकर, आनंद निखार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्यपाल रमेश बैस तीन दिवस विदर्भ दौऱ्यावर

## भंडारा, अमरावती, वर्धा व गडचिरोलीला जाणार

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यपाल रमेश बैस यांचे गुरुवार, ७ डिसेंबरला रात्री ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले असून, १० डिसेंबरपर्यंत ते विदर्भाचा दौरा करणार आहेत. विमानतळावर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलिस आयुक्त अमितेश कुमार, विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. छेरींग दोरजे यांनीत्यांचे स्वागत केले. राज्यपाल बैस यांचा गुरुवारी राजभवनात मुक्काम असून, शुक्रवारी सकाळी ९.४० वाजता ते राजभवन येथून भंडाराकडे प्रयाण करतील. त्यानंतर भंडारा जिल्ह्यातील संरक्षण सेवा अकादमी, शहापूर येथे होणाऱ्या विकसित भारत संकल्प यात्रा कार्यक्रमाला उपस्थित राहतील. शनिवारी ते अमरावती आणि वर्धा जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. तर रविवारी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा करून रात्री ते मुंबईला रवाना होणार आहेत.



# तुम्ही काय करणार? कुक्कुटपालन, शेळीपालन की दुग्धव्यवसाय

**अरुण जोशी**

## पशुसंवर्धनाच्या योजनेसाठी अर्ज केला का?: १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ग्रामीण भागातील सुशिक्षित व बेरोजगार युवकांसह पशुपालक व शेतकऱ्यांना स्वयंरोजगार सुरू करता यावा यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून विविध योजना राबविण्यात येतात. कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय करण्याची संधी आहे.

वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण योजनेमध्ये गेली चार वर्षे ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविणे व लाभार्थी निवड करण्याची पद्धत आहे. आता याबरोबर जिल्हास्तरीय विविध योजनांसाठी सदर संगणक प्रणाली लागू करण्यात आली आहे.यामध्ये शासनाने एखाद्या योजनेसाठी अर्ज केल्यानंतर त्यास दरवर्षी पुन्हा अर्ज करावा लागू नये यासाठी तयार केलेली प्रतीक्षा यादी सन-२०२१ पासून पुढील ५ वर्षांपर्यंत - लागू ठेवण्याची सोय आहे. यामुळे अर्ज केलेल्या पशुपालकांना लाभ मिळण्याची शक्यता वाढली असून, प्रतीक्षा यादीतील क्रमांकानुसार अंदाजे केव्हा लाभ मिळेल हे कळू शकल्यामुळे लाभार्थी हिस्सा भरणे किंवा इतर बाबींसाठी नियोजन करता येते. त्यानुसार नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई- म्हशींचे गट वाटप करणे, शेळी-मेंढीगट वाटप करणे, १००० कुक्कुट पक्ष्यांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १००





कुक्कुट पिलांचे वाटप व २५३ तलंगा गट वाटप या योजनेसाठी ऑनलाइन पद्धतीने लाभार्थी निवड प्रक्रिया राबविली जाणार आहे. पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबीमध्ये अर्ज करावयाचा आहे त्याची निवड करण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे. https// ah.mahabms.com या संकेतस्थळावर तसेच AH.MAHABMS या ॲपद्वारे अर्ज करता येईल.

**अर्ज अचूक भरावा**

अर्ज भरण्यासाठी आधी ९ नोव्हेंबर ते १५ ८ डिसेंबरपर्यंत मुदत होती, आता १५ डिसेंबरपर्यंत मुदत दिली आहे. अर्ज करण्याची पद्धती याबाबतचा संपूर्ण तपशील या संकेतस्थळावर तसेच मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे.

अर्ज भरण्यास १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे, याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. अर्ज भरताना नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर अर्जाच्या स्थितीबाबत संदेश येतात. त्यामुळे शक्यतो मोबाईल क्रमांक बदलू नये, मागील वर्षी अर्ज केलेल्या अर्जदारांनी पुन्हा अर्ज करावयाची आवश्यकता नाही. योजनेबाबत अधिक माहितीसाठी पशुसंवर्धन विभागाच्या स्थानिक कार्यालयांसह टोल फ्री क्रमांकावरही संपर्क करता येईल.

**– जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**

अर्ज फक्त ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जातील. अर्ज अचूक भरावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. विलास गाडगे यांनी केले आहे.

# आता पाचवी, आठवीची पुन्हा वार्षिक परीक्षा; नापास झाल्यास त्याच वर्गात

## दोन्ही इयत्तांसाठी प्रत्येक विषयासाठी ५० ते ६० गुणांसाठी होणार परीक्षा

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी तोंडी, प्रात्यक्षिक व लेखी स्वरूपाच्या वार्षिक परीक्षेचे स्वरूप निश्चित करण्यात आले आहे. परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यानंतर पूरक मार्गदर्शन करून पुनर्परीक्षा घेतली जाईल. मात्र, तरीही विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याला त्याच वर्गात बसविले जाईल. हा बदल २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून लागू राहणार आहे.

दोन्ही इयत्तांसाठी प्रत्येक विषयासाठी ५० ते ६० गुणांसाठी ही परीक्षा होईल. भाषा, गणित, परिसर अभ्यास या विषयांसाठी ही परीक्षा घेतली जाणार आहे. कला, कार्यानुभव आदी इतर विषयांकरिता सध्या प्रचलित असलेले आकारिक मूल्यमापन केले जाईल. इयत्ता पाचवी व आठवीच्या वार्षिक परीक्षेचे आयोजन द्वितीय सत्राच्या अखेरीस म्हणजे एप्रिल महिन्यात होईल आणि इतर इयत्तांसमवेत यांचा निकाल जाहीर केला जाईल. किमान ३५ टक्के गुण उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असतील.

### पुनर्परीक्षाही मूळ परीक्षेनुसारच

परीक्षेत विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास सवलतीचे गुण दिले जातील. मात्र, तरीही तो एक किंवा एकाहून अधिक विषयांत अनुत्तीर्ण होत असेल तर पुनर्परीक्षा घेतली जाईल. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना पूरक मार्गदर्शन केले जाईल. पुनर्परीक्षाही मूळ परीक्षेनुसारच असेल. विदर्भ वगळता जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पुनर्परीक्षा घेण्यात येईल. पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना समकक्ष वर्गात प्रवेश दिला जाईल. सहावी ते आठवीत प्रवेश द्यायचा असल्यास पाचवीची परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल.

२०१० पासून शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता आठवीपर्यंत महाराष्ट्रात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती लागू करण्यात आली आहे. त्यानुसार एकच एक वार्षिक परीक्षेनुसार विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याची पद्धती बंद करण्यात आली. मात्र, यामुळे विद्यार्थी गुणवत्तेत मागे राहतात, अशी ओरड सर्वत्र होऊ लागल्याने पाचवी आणि आठवी करता पुन्हा वार्षिक परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

# सावरकरांचा अपमान करणाऱ्यांनी महाराष्ट्राचा अपमान केलाय, प्रियांश खर्गेविरोधात भाजपा आमदार आक्रमक

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर ८**




काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे सुपुत्र प्रियांश खरगे यांनी कर्नाटक विधानसभेत स्वातंत्र्यवीर सावरकर हे वीर नव्हते. मी प्रभारी असतो तर सावरकरांचा फोटो विधानसभेतून काढून टाकला असता. या वक्तव्यावरून राज्यभर राण पेटले आहे. त्याचे पडसाद आज विधानभवनातही दिसून आलेत. परिसरात भाजपच्या आमदारांनी स्वातंत्र्यावीरांचा अवमान करणाऱ्या काँग्रेसच्या निषेधार्थ निदर्शने केली.

आंदोलनात आशिष शेलार, बंटी भांगडिया, सुनील राणे, प्रवीण दटके, टेकचंद सावरकर, सीमा हिरे, मोनिका रानजळे, हरीभाऊ बागडे, नमिता मुंदडा, राजेश पाडवी, मंदा म्हात्रे, सुधीर गाडगीळ, राणा जगजितसिंग, उमा खापरे, राम कदम, समीर मेघे सहभागी होते. यावेळी बोलताना आशिष शेलार म्हणाले, 'स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान म्हणजे समस्त क्रांतीकारक आणि देशभक्तांचा अपमान आहे. हा देश त्यांचे बलिदान नाकारू शकत नाही. इंदिरा गांधी यांनी स्वत: त्यांच्या बलिदानाचे समर्थन केले होते. पण, काँग्रेस आणि खरगे वारंवार सावरकरांना बदनाम करत आहे. ते महाराष्ट्रद्रोही असून त्यांना उद्धव ठाकरे साथ देत आहेत. त्यामुळे या विषयावर उद्धव ठाकरेंनी जबाब द्यावा.

# प्रफुल्ल पटेल यांच्याबाबत वेगळी भूमिका का? ॲड. यशोमती ठाकूर यांचा सवाल

**दि८ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री नवाब मलिक यांच्या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक पत्र जाहीर केले आहे. या पत्राद्वारे नवाब मलिक यांच्यावर देशद्रोहाचे आरोप असल्यामुळे त्यांना महायुतीत सामावून घेतले जाणार नाही, असे म्हटले आहे.



वास्तविक ही राष्ट्रवादी काँग्रेसला चपराक आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांच्या नेत्यांची जागा दाखवण्याचा हा प्रयत्न आहे. फडणवीस यांना जर खरोखरच देशद्रोहाचा आरोप असल्यामुळे नवाब मलिक यांना सोबत घ्यायचे नसेल तर त्याच पक्षाचे प्रफुल्ल पटेल यांना कसे सोबत घेतले? प्रफुल्ल पटेल यांनी सुद्धा विकत घेतलेल्या मालमत्तेशी कोणाचा संबंध आहे? प्रफुल्ल पटेल यांच्या मागे केंद्रीय तपास यंत्रणा का होत्या? याचीही माहिती फडणवीस यांनी जाहीर करावी. मग प्रफुल्ल पटेल यांच्या बद्दलही का पत्र दिले नाही असा सवाल काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी मंत्री ड.यशोमती ठाकूर यांनी आज उपस्थित केला आहे. नागपूर येथे हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

### सरकारला अधिवेशनात रस नाही

दरम्यान, यावेळी बोलताना ड.ठाकूर पुढे म्हणाल्या की, या सरकारला अधिवेशनात कुठलाही रस नाही. अधिवेशनाच्या कामकाजात सरकारला गांभीर्य आहे असे मला वाटत नाही. परस्परांवर आरोप करण्यात आणि वादविवादाचे राजकारण करण्यात सगळी मंडळी अडकलेली आहे. जनतेने त्यांचे मूलभूत प्रश्न विसरून या निरर्थक वादविवादात अडकावे, अशीच त्यांची इच्छा दिसते आहे. सर्वसामान्य जनतेसाठी त्यांच्या प्रश्नांसाठी काही करावे अशी या सरकारची बिलकुल इच्छा नाही सरकार अजिबात संवेदनशील दिसत नाही. यांचे खायचे दात वेगळे आहेत आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, असेही त्या पुढे म्हणाल्या.

# फडणवीसांनी ते पत्र जाहीर केले नसते तर चांगले झाले असते; वळसे पाटलांचा नाराजीचा सूर

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर ८**

राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांच्या येण्याने महायुतीमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. त्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना खुले पत्र लिहून नवाब मलिक निर्दोष ठरले तर त्यांचे स्वागत करा, पण देशद्रोहाचे आरोप असताना युतीत घेऊ नका अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. यावरून आता राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत.

सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ते पत्र जाहीर केले नसते तर चांगले झाले असते, अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रवादीची भूमिका सुनील तटकरे यांनी मांडली आहे. यामध्ये मिठाचा खडा पडण्याचे काही कारण नाहीय. भारतीय जनता पक्षाने सुद्धा त्यांची भूमिका मांडली आहे, असे वळसे पाटील म्हणाले.

# आज पुन्हा नवाब मलिक सत्ताधाऱ्यांच्या बाकावर बसले

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**



सध्या राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी देशद्रोहाचे आरोप असलेले नवाब मलिक सत्ताधाऱ्यांच्या बाकावर बसल्याने महायुतीत वादळ उठले आहे. विरोधी पक्षांनी आक्षेप घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांना काल पत्र लिहून मलिक यांना महायुतीत घेण्यास विरोध केला आहे.

देशद्रोहाचे आरोप असताना मलिक यांना महायुतीचा भाग करणे योग्य होणार नाही, अशी थेट भूमिका फडणवीस यांनी आपल्या पत्रात मांडली. मात्र अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही (आज) नवाब मलिक सत्ताधाऱ्यांच्या बाकावर बसल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे विरोधक पुन्हा आक्रमक होण्याची शक्यता आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आता कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

### अजित पवार काय म्हणाले?

देवेंद्र फडणवीसांच्या पत्राबद्दल बोलताना अजित पवार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेलं पत्र मला मिळालं असून मी ते पत्र वाचलं आहे. २ जुलैला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महायुतीला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. या सर्व घडामोडीनंतर नवाब मलिक हे कालच पहिल्यांदा सभागृहात आले आणि ते कुठे बसले हे सर्वांना माहीत आहे. मात्र त्यांनी स्पष्टपणे या सगळ्या घडामोडींबाबत भूमिका मांडलेली नाही. मलिक यांनी आपली भूमिका मांडल्यानंतर मी कालच्या पत्राबद्दल भूमिका मांडणार आहे, असं अजित पवारांनी म्हटलं आहे. यासंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नावर बोलताना अजित पवार काहीसे चिडलेले पाहायला मिळाले.

# प्रियांश खरगे विरुद्ध भाजप रस्त्यावर, दर्यापूर येथे जोरदार निदर्शने



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मलिकार्जुन खरगे यांचे पुत्र तथा कर्नाटक सरकारमधील मंत्री प्रियांश खरगे यांनी स्वतंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांचा अपमान केल्याप्रकरणी भारतीय जनता पार्टीने आक्रमक होत घरगे यांच्याविरुद्ध जोरदार घोषणाबाजी करत भाजपने त्यांचा निषेध नोंदविला. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या त्यागाची बलिदानाची कल्पना नसल्यामुळेच सातत्याने कोंग्रेस कडून त्यांचा अपमान होत असल्याचा आरोप यावेळी भाजपच्या वतीने करण्यात आला.स्थानिक जयस्तंभ चौकात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी रस्त्यावर उतरत राज्यसभेचे खासदार भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली खरगे यांच्याविरुद्ध तीव्र आंदोलन केले. खरगे यांचा पुतळा जाळण्यात आला. त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी माजी आमदार रमेश बुंदिले, भाजपचे सरचिटणीस डॉ. विलास कविटकर, युवा मोर्चा प्रभारी समीर हावरे, जिल्हाध्यक्ष अजिंक्य वानखडे, विधानसभा प्रमुख गोपाल चंदन, तालुका अध्यक्ष मदन पाटील बायस्कर, रविन्द्र ढोकने, विजय मेंढे, अंजनगाव सुर्जीचे रवी गोळे, उमेश भोंडे, नकुल सोनटक्के, प्रफुल्ल कुरहेकर, मनीष मेन, ऋषिकेश इंगळे, कुलदीप हागे, अभिजीत मावळे, रोशन चकुले यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्यापुर गोळीबार प्रकरणी तीन आरोपींना अटक

## पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांची पत्रपरिषदेत माहिती : अन्य आरोपींचा शोध सुरू

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



गुरुवारी रात्री दर्यापुर-अमरावती रोड, दर्यापुर येथील रफत पेट्रोलपंप समोर गोळीबाराच्या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरून गेला होता यातील तर अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमने मोठ्या शिताफीने पकडून दोन गुन्हेगारांना जेरबंद केले आहे. तर या प्रकरणाची कसून चौकशी केली असता प्रकरण वेगळेच निघाले.

पोलीस सूत्रांच्या मिळालेल्या माहितीनुसार घटनेची पार्श्वभूमी अशी कि, यातील आरोपी नामे महेश जालमसिंग हरदे व जखमी पिडीत तरूणी यांची सोशल मिडीयावर (इंस्टाग्रामवर) ओळख झाली होती, आरोपी हा बंगलोर मध्ये प्रापर्टी ब्रोकर म्हणन काम करीत होता व जखमी ही अमरावती येथे शिक्षण घेत होती. त्यानंतर त्यांची मैत्री वाढत गेली व आरोपी हा बंगलोर वरून अमरावती येथे वास्तव्यास आला व कठोरा नाका परिसरात घर भाडयाने घेवुन राहु लागला होता. आरोपी हा काही दिवसांपूर्वी पिडीत तरुणी हीचे अंजनगाव येथील घरी गेला व पिडीत तरुणीच्या आई-वडीलास म्हणाला होता कि, मी तुमच्या मुलीसोबत लग्न केले आहे, तिला माझे सोबत पाठवा त्यावेळी त्यांने त्या दोघांच्या विवाह संबंधाचे कागदपत्रे सुध्दा दाखविली होती, परंतु पिडीत तरुणीने तिचे आईवडीलास ही बाब खोटी असल्याचे सांगुन विवाहाचे कागदपत्रे बनावट असल्याचे सांगितले. त्यानंतर पिडीत तरुणीचे आई वडीलांनी त्यास त्यांचे घरातुन निघुन जाण्यास सांगीतले. त्यानंतर आरोपी नामे महेश जालमसिंग हरदे याने पिडीत तरुणी व तीच्या आई-वडीलांच्या नावाने पो.स्टे. गाडगे नगर (अमरावती शहर) येथे तक्रार दिल्याने सदर तकारीचे चौकशी करीता दिनांक ०७ / १२ / २०२३ रोजी पिडीत तरूणी ही तिची आई वडील व परीचयातील गजानन हरपुळे सर्व रा अंजनगाव सुर्जी यांचेसह पो.स्टे. गाडगेनगर (अमरावती शहर) येथे आले होते. तेथील कामकाज संपल्यानंतर ते अमरावती ते अंजनगाव कडे जाण्याकरीता निघाले असता आरोपीतांनी दुचाकी व चारचाकी वाहनाने त्यांचा पाठलाग करुन दर्यापुर नजीक त्यांचेवर चालत्या वाहनातून गोळया झाडल्या, त्यात पिडीत तरुणी हीच्या मानेला गोळी लागली तसेच गजानन हरपुळे सुध्दा जखमी झाले. त्यानंतर आरोपी हे १) बी.एम.डब्ल्यु. क्र. एम. एच ०२ ए. जे. ६११९ २) इनोव्ही क्रं. एम. एच १९ सी. एफ २११ ३) पल्सर दुचाकी वाहनाने घटनास्थळावरुन भातकुली मार्गे अमरावती शहर कारंजा लाड असे पळुन गेले होते.

पोलीसांनी त्वरीत सतर्कता दाखवून केलेल्या पाठलागाअंती आरोपी कारंजा लाड येथे स्था. गु.शा.अम.ग्रा. चे पथकास मिळुन आलेले आहे. गुन्हा करतेवेळी आरोपी महेश जालमसिंग हरदे सोबत १) श्रध्दा हरेल, वय २२) अजय चंद्रकांत पवार, वय ४५ सर्व रा मलकापुर व अन्य २ फरार साथीदार सोबत असल्याचे सांगीतले आहे. फरार आरोपी नामे १) आकाश चव्हाण २) पुरुषोत्तम राठोड ३) धनंजय दिधोरकर यांचा कसून शोध घेणे सुरु आहे. आरोपीतांना पुढील तपास कामी दर्यापुर पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले असुन पुढील तपास दर्यापुर पोलीस करित आहे

सदरची कार्यवाही मा. श्री. विशाल आनंद, पोलीस अधिक्षक, अमरावती प्रा. मा. श्री. विक्रम साळी, अपर पोलीस अधिक्षक, अमरावती, श्री. गुरुनाथ नायडु, उप-विभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनात श्री. किरण वानखडे, पो. नि., स्था.गु.शा., अमरावती ग्रा. श्री. संतोष टाले, पो. नि. दर्यापुर, तसेच स.पो.नि. सचिन पवार, पो.उप.नि.. नितीन चुलपार, संजय शिंदे, सागर हटवार यांचेसह स्था. गु.शा येथील सर्व पोलीस अमलदार यांचे पथकाने केली आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयातील आरोपी नामे १) महेश जालमसिंग हरदे २) श्रध्दा हरेल ३) अजय चंद्रकांत पवार सर्व रा मलकापुर यांना ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेली चारचाकी वाहन १) बी.एम.डब्ल्यु.क्रं.एम.एच ०२ए.जे. ६११९ २) इनोव्हा क्र. एम.एच १९ सी.एफ २११ ३) पल्सर दुचाकी वाहन जप्त करण्यात आली आहे.

# टोलमुळे शासनाला महसुलाची 'समृद्धी'! महामार्गावर ४२२ कोटी ९ लाख रुपये वसूल

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक वाशिम**

समृद्धी महामार्ग सुरु झाल्यानंतर या महामार्गावरून डिसेंबर २०२२ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत ५४ लक्ष ५४ हजार ८६२ वाहने धावली. या वाहनांकडून ४२२ कोटी ९ लक्ष ७९ हजार ३९९ रुपयांचा टोल महसूल जमा झाला आहे.

समृद्धी महामार्ग सुरु झाल्यानंतर नागपूर ते मुंबई, शिर्डी, नाशिक व इतर शहरांमधील अंतर कमी झाले. हळू हळू या मार्गावर वाहनांची वर्दळ वाढली. मात्र वाढत्या अपघातांमुळे रस्त्यावर अनेक प्रश्न उपस्थित झाले. ३० नोव्हेंबरपर्यंत या मार्गावर विविध गंभीर प्रकारचे ७३ अपघात होऊन या अपघातात १४२ जणांना आपले प्राण गमावले लागले. तर ४ डिसेंबर २०२३ पर्यंत १ हजार ४८९ अपघात झाले. या महामार्गावरून डिसेंबर २०२२ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत ५४ लक्ष ५४ हजार ८६२ वाहने धावली आहेत. या वाहनांकडून ४२२ कोटी ९ लक्ष ७९ हजार ३९९ रुपये टोल महसूल वसूल झाल्याची माहिती सुरोसे यांनी दिली.

# उत्पादन घट तरीही सोयाबीनचे दर हमीभावापेक्षा कमी, शेतकऱ्यांची चिंता वाढली

## बाजारात सोयाबीनच्या दरात घसरण सुरूच

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



यंदा खरीप हंगामात अनियमित पावसामुळे सोयाबीनचे उत्पादन कमी झाले असले, तरी बाजारात सोयाबीनच्या दरात घसरण सुरूच आहे. गेल्या आठवड्यात सोयाबीनला ५ हजार २०० रुपयांपर्यंत दर मिळाला, त्यात आता घट आली असून सध्या ४ हजार ते ४ हजार ६०० रुपये दर मिळत आहेत.

यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीनमधून शेतकऱ्यांच्या हाती काही फारसे आले नाही. उत्पादनात घट झाल्याने दर वाढतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. गेल्या आठवड्यात प्रतिक्विंटल ५ हजार ते ५ हजार २०० रुपये दर मिळाला. त्यामुळे भावात आणखी वाढ होण्याची आशा होती. पण गेल्या काही दिवसांत सोयाबीनचे दर स्थिरावले आणि आता अचानक दरात घसरण झाल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत ६ डिसेंबर रोजी २ हजार ९६१ क्विंटल सोयाबीनची आवक झाली आणि किमान ४ हजार ६५० तर कमाल ४ हजार ७२७ म्हणजे सरासरी ४ हजार ५८० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. अकोला बाजार समितीत २ हजार ६४० क्विंटल सोयाबीनची आवक झाली. किमान ४ हजार २०० रुपये तर कमाल ४ हजार ७५५ रुपये भाव मिळाला. सरासरी दर ४ हजार ५०० इतका होता. केंद्र सरकारने सोयाबीनला ४ हजार ६०० रुपये प्रतिक्विंटल हमी भाव जाहीर केला आहे. बाजारात हमीभावापेक्षा दर कमी झाल्याने शेतकरी चांगलेच अडचणीत सापडले आहेत.

अनेक भागांत यंदा सोयाबीनवर 'यलो मोझॅक'चे आक्रमण झाले. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना फटका बसला. शेतकऱ्यांच्या हाती एकरी तीन ते चार तर काहींना दोन ते तीन क्विंटल सोयाबीन आले. उत्पादन खर्च निघेल एवढाही दर मिळेनासा झाला आहे. कापूस फारसा समाधानकारक झाला नाही. अतिवृष्टीमुळे कापसाचे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी भाववाढीच्या अपेक्षेमुळे सोयाबीन घरातच साठवून ठेवली. निसर्गाच्या लहरीपणामुळे उत्पादनात घट झाली.